ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज™
WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 18 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## अभिजीत दिपकेंना मोठा दिलासा; कोर्टाकडून सशर्त जामीन मंजूर!





पान 3 वरुन...

पाणीबचतीसाठी महापालिकेचा 'ॲक्शन प्लॅन'!

### अमेरिकेत इंधनदर नियंत्रणासाठी रशियावरील काही निर्बंध शिथिल



# ट्रम्प यांचा यू-टर्न; भारताला दिलासा?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनॉल्ड ट्रम्प यांनी रशियाविरुद्धचे अनेक निर्बंध, अटी आणि सीमाशुल्क (ड्युटीज) तूर्तास शिथिल केले आहेत. युक्रेनवरील आक्रमणावरून मॉस्कोवर दबाव वाढवण्यासाठी लागू केलेल्या कायद्यावर स्वाक्षरी केल्यानंतर अवघ्या काही आठवड्यांतच त्यांनी हे पाऊल उचललं. आगामी ३ नोव्हेंबरच्या मध्यवर्ती निवडणुकांपूर्वी अमेरिकेतील डिझेलचे गगनाला भिडलेले दर कमी करणे आणि रशियाकडून ऊर्जा खरेदी करणाऱ्या भारतासारख्या देशांवरील दबाव कमी करणे, हा यामागील प्रशासनाचा मुख्य हेतू आहे.**





शनिवारी जारी केलेल्या एका कार्यकारी आदेशात ट्रम्प यांनी 'लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट २०२६' मधील एका तरतुदीचा वापर केला, जी अमेरिकेच्या अध्यक्षांना राष्ट्रीय हितासाठी निर्बंध शिथिल करण्याचे अधिकार देते. या निर्णयाचा आधार स्पष्ट करणारे आवश्यक प्रमाणपत्र आणि अहवाल आपण संसदेला सादर केला असल्याचं ट्रम्प यांनी सांगितलं.





या आदेशानुसार कायद्याच्या कलम ११२ आणि ११३ अंतर्गत असणारे शुल्क, कलम १०२(डी) अंतर्गत असणारे निर्बंध आणि परदेशी व्यक्ती व संस्थांवरील इतर अनेक निर्बंध तात्पुरते उठवण्यात आले आहेत. ट्रम्प किंवा परराष्ट्र मंत्री (सेक्रेटरी ऑफ स्टेट) जोपर्यंत पुढील कारवाई आवश्यक असल्याचा निर्णय घेत नाहीत, तोपर्यंत हे निर्बंध शिथिल राहतील.

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासोबत झालेल्या अत्यंत यशस्वी चर्चेनंतर अमेरिका रशियन डिझेल खरेदी करणार असल्याचं ट्रम्प यांनी जाहीर केलं होतं, त्यानंतर हा निर्णय समोर आला आहे. मॉस्को ताबडतोब ३ लाख टनांपेक्षा जास्त डिझेलचा पुरवठा करण्यास तयार झाला असून, नोव्हेंबर आणि त्यानंतरच्या महिन्यांत आणखी पुरवठा होण्याची अपेक्षा असल्याचं ट्रम्प म्हणाले.

ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर पोस्ट करत म्हटलं की, "होर्मुझच्या सामुद्रधुनीवर आपले असलेले पूर्ण नियंत्रण आणि रशियन ऊर्जेबाबतची ही मोठी घोषणा, यामुळे अमेरिकन नागरिकांसाठी आणि संपूर्ण जगासाठी डिझेलचे दर अत्यंत वेगाने आणि विक्रमी पातळीवर खाली येतील." अमेरिकन नागरिक, विशेषतः शेतकरी, पशुपालक आणि ट्रक चालकांसाठी इंधनाचे दर कमी करणे ही आपली 'सर्वोच्च प्राथमिकता' असल्याचं त्यांनी पुढे नमूद केलं.

या कायद्यात रशियन वस्तूंवर ५००% अतिरिक्त शुल्क लागू करण्याची तरतूद आहे (काही अपवाद आणि सवलती वगळता). तसेच, रशियाकडून मोठ्या प्रमाणावर ऊर्जा आयात करणाऱ्या आणि निर्बंध टाळण्यास मदत करणाऱ्या देशांमधील वस्तूंवर १००% शुल्क लावण्याची तरतूद देखील यात आहे. या कार्यकारी आदेशानुसार, अमेरिकेचे व्यापारी प्रतिनिधी (USTR) इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून विविध देशांच्या रशियन क्रूड ऑइल आणि नैसर्गिक वायूच्या खरेदीवर, तसेच निर्बंध टाळण्याच्या प्रयत्नांवर बारीक लक्ष ठेवतील आणि याचा अहवाल अध्यक्षांना सादर करतील.

## भारतावरील दबाव कायम?

रशियाकडून तेल खरेदी कमी करण्यासाठी वॉशिंग्टनने भारतावर वारंवार दबाव आणल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय आला आहे. ट्रम्प प्रशासनाने नवी दिल्लीला मॉस्कोवरील आपले अवलंबित्व कमी करण्यास भाग पाडण्यासाठी टॅरिफ (शुल्क) वाढवण्याच्या धमक्या दिल्या होत्या, ज्यामुळे रशियन ऊर्जा व्यापार हा भारत-अमेरिका आर्थिक संबंधांमधील एक महत्त्वाचा मुद्दा बनला होता. रशियन ऊर्जा व्यापारावरील निर्बंध शिथिल केल्यामुळे भारताला आपल्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी आणि अमेरिकेच्या संभाव्य व्यापारी दंडात्मक कारवाईपासून वाचण्यासाठी अधिक वाव मिळू शकतो. मात्र, या ताज्या सवलतींमुळे भारतावर परिणाम करणारे सर्व टॅरिफ किंवा इतर व्यापारी निर्बंध पूर्णपणे मागे घेण्यात आले आहेत, असे स्पष्ट होत नाही.

# कात्रज चौकात जड वाहनांना बंदी!

## भूमिगत मेट्रोच्या कामामुळे वाहतूक व्यवस्थेत बदल; पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन

**महाईन्यूज । पुणे**

**स्वारगेट ते कात्रज दरम्यान भूमिगत मेट्रोचे काम सुरू आहे. कात्रज चौकातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक शाखेने अवजड वाहनांच्या वाहतुकीत बदल करण्याचे आदेश दिले आहेत. 'कात्रज चौकातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहे. जड आणि अवजड वाहनांनी (डंपर, सिमेंट मिक्सर, ट्रेलर, कंटेनर) कात्रज चौकातून न जाता पर्यायी मार्गांचा वापर करावा', असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी केले आहे. पुणे-सातारा महामार्गावर कात्रज जुन्या बोगद्यामार्गे येणाऱ्या वाहनांना शिंदेवाडीपासून प्रवेश बंद करण्यात येणार आहे.**



सातारा रस्त्यावरुन नवीन बोगदामार्गे कात्रजकडे येणाऱ्या वाहनांना नवले पूल येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. मुंबई-बेंगळुरू बाह्यवळण मार्गावरील वारजे भागातून कात्रजकडे येणाऱ्या वाहनांना नवले पूल येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. सोलापूरकडून हडपसर, मंतरवाडी, कात्रज-कोंढवा रस्त्याने कात्रजकडे येणाया जड वाहनांना मंतरवाडी चौकाच्या पुढे प्रवेश बंद करण्यात येणार आहे.

बोपदेव घाटमार्गे कात्रज-कोंढवा रस्त्याने कात्रजकडे येणाऱ्या जड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. मार्केट यार्ड, गंगाधाम, बिबवेवाडीमार्गे कात्रजकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. स्वारगेटकडून कात्रज चौकात जाणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे.

मुंबईकडून वारजेमार्गे कात्रजकडे येणाऱ्या वाहनांना नवले पूल येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. साताऱ्याहून स्वारगेटकडे येणाऱ्या एसटी बस, प्रवासी वाहनांनी नवले पूल परिसरातून उजवीकडे वळावे. कात्रज मार्गे स्वारगेटकडे जावे.

कात्रजकडून स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनांनी कात्रज चौकातून न जाता. अन्य पर्यायी मार्गांचा वापर करावा. वंडरसिटी सोसायटी ते कात्रज बायपास चौकात दुतर्फा वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. कात्रज बायपास चौक ते मोरे बाग दुतर्फा वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. कात्रज बायपास चौक ते राजस सोसायटी, बायपास चौक ते कात्रज जुना बोगद्यापर्यंत वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे.

### पर्यायी मार्ग

अवजड, जड वाहनांनी नवले पूल, नवीन कात्रज बोगदा, खेड शिवापूर, सासवड, गराडे, चिंबळी, सासवड, मंतरवाडी, वडकी या मार्गाचा वापर करावा. नवले पूल, नवीन कात्रज बोगदा, खेड शिवापूर, गराडे, भिवरी, बोपदेव घाट, येवलेवाडी, पिसोळी, मंतरवाडी या मार्गाचा वापर करावा.

# राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून महापौरांना 'वॉटर प्युरिफायर' भेट!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणेकरांना शुद्ध आणि सुरक्षित पाणीपुरवठा करावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेत आंदोलन केले. या वेळी महापौर मंजूषा नागपुरे यांना 'वॉटर प्युरिफायर' भेट देऊन खडकवासला धरण परिसरातील सांडपाणी व्यवस्थापनाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली. विरोधी पक्षाने केलेल्या या आंदोलनामुळे सभागृहातील वातावरण काही काळ तापले होते.**



विरोधी पक्षनेते नीलेश निकम, नगरसेवक वैशाली बनकर, सुहास टिंगरे, अमोल बालवडकर, नंदिनी धेंडे, रवी टिंगरे हे नगरसेवक आंदोलनात सहभागी झाले. नगरसेवक बालवडकर यांनी तीन दिवसांपूर्वी खडकवासला धरण परिसरात प्रत्यक्ष पाहणी केली. त्या वेळी गोऱ्हे बुद्रुक, गोऱ्हे खुर्द, सिंहगड पायथा, खानापूर, मांडवी आणि कुडजे परिसरातील काही हॉटेल्स, तसेच फार्म हाऊस व्यावसायिक त्यांचे सांडपाणी सर्रासपणे जलस्रोतांमध्ये सोडत असल्याचा आरोप त्यांनी केला.

या भागातील खासगी मालमत्तांमधून मोठ्या प्रमाणात सांडपाणी खडकवासला धरणात सोडले जात असल्याने हेच पाणी महापालिकेला मिळते. या सर्व प्रकारामुळे पुणेकरांच्या पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. या परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे वाढत असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासन अपयशी ठरले असल्याचा आरोप केला जात आहे.

या सर्व गोष्टींच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नगरसेवकांनी आंदोलन करून पुणेकरांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी द्यावे, अशी मागणी केली. या वेळी महापौर नागपुरे यांना 'वॉटर प्युरिफायर' भेट देण्यात आला. 'सुरक्षित आणि शुद्ध पाणी मिळणे पुणेकरांचा मूलभूत अधिकार असून, धरण परिसरातील सांडपाण्याच्या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे,' अशी मागणी आंदोलकांनी केली.

'धरण परिसरात सांडपाणी सोडले जात असल्याच्या तक्रारींची सखोल चौकशी करावी, प्रक्रिया न केलेले सांडपाणी जलस्रोतांमध्ये सोडणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करावी. शहराला सुरक्षित पाणीपुरवठा होत असल्याची खात्री करावी,' अशी मागण्याही या वेळी करण्यात आली.

### मग पालकमंत्र्यांनाही 'फ्युरिफायर' भेट द्या : भाजप

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने महापौर नागपुरे यांना 'फ्युरिफायर' भेट देण्याच्या मुद्द्यावर भाजपचे नगरसेवक पुनीत जोशी यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. 'पुणे शहराला दूषित पाणीपुरवठा होण्यास जिल्ह्यातील उद्योग जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे महापौरांना 'वॉटर प्युरिफायर' भेट देण्याऐवजी प्रथम जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना 'वॉटर प्युरिफायर' भेट द्यावा,' अशी मागणी त्यांनी केली.

# पाणीबचतीसाठी महापालिकेचा ‘ॲक्शन प्लॅन’!

## पिंपरी-चिंचवडमध्ये १० टक्के पाणीकपातीचे नियोजन; गैरवापर करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अपुऱ्या पर्जन्यमानामुळे आणि आगामी काळात पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेता, नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर अत्यंत जबाबदारीने आणि काटकसरीने करावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.**



संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात करण्याच्या अनुषंगाने महापालिकेने तातडीने उपाययोजना सुरू केल्या असून, पाण्याचा गैरवापर रोखण्यासाठी प्रभाग स्तरावर विशेष तपासणी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, एल निनोच्या प्रभावामुळे यंदा तसेच पुढील वर्षी राज्यात पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. सध्या उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यातून दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणीपुरवठा करता यावा, यासाठी सर्व महानगरपालिका आणि इतर संबंधित संस्थांनी पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात करावी, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार पाण्याचे नियोजन आणि काटकसरीच्या वापरासाठी महापालिकेने कार्यवाही सुरू केली आहे.

गृहनिर्माण सोसायट्यांनी उद्याने, हिरवळी आणि झाडांना पिण्याच्या पाण्याऐवजी एसटीपी (सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प) तसेच जीटीपीच्या प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर करावा. एसटीपी बंद ठेवणाऱ्या सोसायट्यांचे नळजोड कायमस्वरूपी बंद करण्यात येतील, असा इशाराही महापालिकेने दिला आहे.

शहरातील सर्व्हिस सेंटरमध्ये अनधिकृतरीत्या पिण्याच्या पाण्याचा नळजोड वापरला जात असल्यास तो तातडीने बंद करण्यात येईल. तसेच संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. वाहनांची धुलाई, टेरेस आणि अंगण धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

नवीन गृहप्रकल्पांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याने त्यांना पिण्याच्या पाण्यापुरते मर्यादित व्यासाचे नळजोड देण्यात येतील. महापालिकेच्या नळजोडाला विद्युत पंप लावून पाणी उपसा केल्याचे आढळल्यास संबंधित विद्युत पंप जप्त करून दंडात्मक कारवाई करण्यात येईल. याशिवाय वॉशिंग सेंटर आणि इतर मोठ्या व्यावसायिक प्रकल्पांना नवीन नळजोड दिले जाणार नाहीत.

व्यावसायिक आस्थापना, बांधकाम प्रकल्प आणि इतर बिगर घरगुती वापरकर्त्यांनी आवश्यक पाण्याची व्यवस्था स्वतःच्या स्तरावर करावी. घरगुती वापर, शाळा आणि रुग्णालये यांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी पिण्याच्या पाण्याचा गैरवापर होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

जमिनीवरील संपवेल तसेच इमारतींवरील पाण्याच्या टाक्यांमधून पाणी वाहून जाणार नाही किंवा गळती होणार नाही, याची नागरिकांनी दक्षता घ्यावी. रस्त्यावरील पाणीपुरवठ्याच्या वाहिन्यांमधून होणारी गळती निदर्शनास आल्यास त्याची माहिती तातडीने पाणीपुरवठा विभागाला द्यावी. भूजलपातळीही पुरेशी नसल्याने बोअरवेलच्या पाण्याचा वापरदेखील जपून आणि आवश्यक तेवढाच करावा.

बांधकाम व्यावसायिकांनी बांधकामासाठी बोअरवेलच्या पाण्याचा वापर न करता महापालिकेच्या एसटीपीमधून उपलब्ध होणाऱ्या प्रक्रियायुक्त पाण्याचाच वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नदीतून अनधिकृतरीत्या पाणी उपसून ते विहिरीत अथवा टाकीत साठवून टँकरद्वारे विक्री करणाऱ्यांनी हा प्रकार तातडीने बंद करावा. अशा प्रकारचा अनधिकृत उपसा आढळल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

### पाणीबचत करणाऱ्या सोसायट्यांचा होणार सन्मान!

पाण्याचा काटकसरीने आणि नियोजनबद्ध वापर करणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना महापालिकेच्या वतीने सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचवेळी पाण्याचा गैरवापर रोखण्यासाठी विशेष तपासणी पथकांमार्फत पाहणी केली जाणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. आज वाचविलेला प्रत्येक थेंब उद्याची आणि पुढील वर्षाची पाणी सुरक्षितता निश्चित करेल. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर आवश्यक तेवढाच करावा, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि पाणी बचतीच्या या प्रयत्नांत महापालिकेला सहकार्य करावे,” असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

# महापालिकेजवळील वृक्षतोडीप्रकरणी २२ ऑक्टोबरला ‘वृक्ष अंत्ययात्रा’ आंदोलन!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका मुख्यालयाशेजारील बांधकाम प्रकल्पासाठी ५२ पेक्षा अधिक जुन्या वृक्षांची तोड करताना कागदपत्रांमध्ये वृक्षांची संख्या आणि वय कमी दाखवण्यात आल्याचा गंभीर आरोप आम आदमी पार्टीने (आप) केला आहे. या प्रकरणातील कथित गैरव्यवहाराचा आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाचा निषेध करण्यासाठी आप पिंपरी-चिंचवड आणि महाराष्ट्र राज्य युवक आघाडीच्या वतीने गुरुवार, २२ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता ‘वृक्ष अंत्ययात्रा’ आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांनी दिली.**






महापालिकेजवळील संबंधित बांधकाम प्रकल्पासाठी सुखवानी असोसिएट्स या बांधकाम व्यावसायिकाला आर्थिक फायदा पोहोचवण्यासाठी वृक्ष प्राधिकरणाचा मूळ अहवाल बदलण्यात आल्याचा आरोप आपकडून करण्यात आला आहे. उद्यान अधीक्षक महेश गारगोटे आणि राजेश वसावे या अधिकाऱ्यांनी अहवालात फेरफार करून वृक्ष प्राधिकरण समितीचे अध्यक्ष आणि जनतेची दिशाभूल केल्याचा दावा पक्षाने केला आहे. या कथित प्रकारामुळे बिल्डरला दीड कोटी रुपयांहून अधिक रुपयांचा फायदा झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात संबंधित बांधकाम व्यावसायिकासह कथितरीत्या अहवालात बदल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आप युवक आघाडीने केली आहे. दिशाभूल करून मिळवलेली बांधकाम परवानगी रद्द करावी, तसेच नियमानुसार १,०१८ वृक्षांच्या लागवडीसाठी प्रतिवृक्ष १५ हजार रुपये याप्रमाणे सुमारे १ कोटी ५२ लाख रुपयांचा दंड वसूल करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, महेश गारगोटे आणि राजेश वसावे यांना तातडीने निलंबित करावे आणि संपूर्ण प्रकरणाची विभागीय स्तरावर सखोल चौकशी करावी, अशी भूमिका पक्षाने मांडली आहे.

या कथित गैरव्यवहाराची माहिती अतिरिक्त आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप रविराज काळे यांनी केला.

> “ दि.२२ गुरुवारी दुपारी ३ वाजता वृक्षतोड झालेल्या ठिकाणापासून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आऊटगेटपर्यंत ‘वृक्ष अंत्ययात्रा’ काढण्यात येणार आहे. ‘वृक्षतोड थांबवा, निसर्ग वाचवा!’ या घोषणेसह आयोजित आंदोलनात शहरातील पर्यावरणप्रेमी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आम आदमी पार्टी महाराष्ट्र राज्य युवक आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.
>
> **- रविराज काळे, प्रदेशाध्यक्ष, आम आदमी पार्टी व महाराष्ट्र राज्य युवक आघाडी.**



## भूमिका

**महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये दुष्काळाचे सावट गडद होत असताना पाण्याच्या काटेकोर नियोजनाची गरज निर्माण झाली आहे. अपुरा पाऊस, धरणांमधील घटता पाणीसाठा, वाढते तापमान आणि भूजलाचा अनिर्बंध उपसा यामुळे आगामी काळात पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.**

# पाणीकपातीचे संकट



या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागू केलेली दहा टक्के पाणीकपात परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता योग्यच म्हणावी लागेल. मात्र, केवळ पाणीकपात करून हे संकट दूर होणार नाही. त्यासाठी दीर्घकालीन जलव्यवस्थापन आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

भारतासारख्या कृषिप्रधान देशाची अर्थव्यवस्था आणि शेती प्रामुख्याने मान्सूनवर अवलंबून आहे. मात्र, एल निनोचा प्रभाव आणि पावसातील अनियमितता यामुळे जलस्रोतांवरील ताण वाढण्याची भीती आहे. अनेक भागांत अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने धरणांमधील पाणीसाठा कमी राहिला आहे. त्यात वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचे प्रमाण वाढत असल्याने उपलब्ध पाण्याचे जतन करणे अधिक महत्त्वाचे ठरते. पुढील पावसाळ्यापर्यंत नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा करण्याचे मोठे आव्हान सरकार आणि प्रशासनासमोर असेल.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या वेगाने विस्तारत असलेल्या शहरांमध्ये पाण्याची मागणी सातत्याने वाढत आहे. वाढती लोकसंख्या, नागरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे उपलब्ध जलस्रोतांवर अतिरिक्त ताण पडत आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये आधीपासूनच एक दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने आणखी पाणीकपात झाल्यास नागरिकांच्या अडचणी वाढू शकतात. दुसरीकडे, विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक भागांना दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. त्यामुळे पाणीवाटप करताना प्रादेशिक परिस्थिती, उपलब्ध साठा आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांचा विचार करणे आवश्यक आहे.

पाणीटंचाईच्या काळात केवळ नागरिकांवर निर्बंध लादण्याऐवजी प्रशासनाने स्वतःच्या व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. जुन्या जलवाहिन्यांमधून होणारी गळती, अनधिकृत नळजोडण्या आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी ठोस उपाययोजना हव्यात. बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर मर्यादित करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर वाढवणे आणि पावसाचे पाणी साठवण्याच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. पाणीकपातीचे नियम सर्वांना समान लागू होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

भूजलपातळी खालावणे हीदेखील गंभीर समस्या बनली आहे. वाढत्या काँक्रिटीकरणामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाण कमी होत आहे. परिणामी, अनेक भागांत उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच विहिरी आणि कूपनलिका कोरड्या पडतात. त्यामुळे पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, जलसंधारण आणि भूजल पुनर्भरण यांवर भर दिला पाहिजे. पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था केवळ बांधकामाच्या परवानगीपुरती मर्यादित न राहता तिची नियमित देखभालही झाली पाहिजे.

पाणी ही अमर्याद उपलब्ध असलेली संपत्ती नाही, याची जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे. वाहन धुणे, रस्त्यावर पाणी मारणे आणि अनावश्यक वापर टाळणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. घरगुती पातळीवर पाण्याचा काटकसरीने वापर केल्यास मोठ्या प्रमाणात बचत होऊ शकते.

पाणीकपात हा तात्पुरता उपाय असला, तरी पाणीबचत आणि शाश्वत जलव्यवस्थापन हाच दीर्घकालीन मार्ग आहे. संकट तीव्र झाल्यानंतर उपाय शोधण्यापेक्षा आतापासूनच नियोजन करणे अधिक शहाणपणाचे ठरेल. सरकार, प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रित प्रयत्न केले, तरच भविष्यातील पाणीसंकटाची तीव्रता कमी करता येईल.

## प्रासंगिक »

### अहंकाराने पराभव

**गंधर्वकुळातील गुत्तिलकुमार नावाचा एक गंधर्व वीणा वादनात सिद्धहस्त होता. संपूर्ण वाराणसीत त्याची ख्याती पसरलेली होती. त्याच वेळी उज्जयिनीमध्ये मुसिल नावाचा एक गंधर्व राहत होता.**

एकदा त्याला उज्जयिनीच्या राजदरबारात वीणा वादनासाठी निमंत्रित केले होते. मुसिलचे वीणावादन कोणालाच आवडले नाही. त्यानंतर मुसिलने गुत्तिलकडे शिकण्याचा निश्चय केला. मुसिल वाराणसीत गुत्तिलकडे गेला. त्याने त्याचे शिष्यत्व पत्करले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याने गुत्तिलकडे राजदरबारात काम करण्याची इच्छा प्रकट केली. गुत्तिलने मोठ्या मनाने राजाशी त्याची भेट घालून दिली. राजाने गुत्तिलला जेवढे मानधन होते त्यापेक्षा अर्ध्या मानधनात काम करण्याचे सांगितले. मुसिलचा अंदाज होता की आपल्यालाही तितकेच मानधन मिळायला कारण आपणही गुत्तिलच्या इतके श्रेष्ठ कलाकार आहोत.राजाने मुसिलला आपली क्षमता सिद्ध करण्यास सांगितले. त्या स्पर्धेत गुत्तिलने एक कठीण तान छेडली जी त्याने मुसिलला शिकविली नव्हती. शेवटी अशा प्रकारची तान न छेडता आल्याने मुसिलला आपला पराभव मान्य करावा लागला.

- तात्पर्य : **गुरुलाच अहंकाराने आव्हान देणे कधीच योग्य ठरत नाही.**

जागतिक राजकारणात नैतिकतेची भाषा बोलणाऱ्या महासत्तांचा खरा चेहरा अनेकदा त्यांच्या कृतीतून समोर येतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची रशियन इंधनाबाबतची भूमिका याच दुटप्पी धोरणाचे उदाहरण म्हणून पाहता येईल.

# अमेरिकेची दुटप्पी नीती; स्वार्थापुढे नैतिकता दुय्यम!

रशियाकडून कच्चे तेल खरेदी केल्याबद्दल भारतासारख्या देशांवर दबाव आणणारी अमेरिका स्वतःच्या देशातील इंधनाचे दर वाढल्यानंतर रशियन इंधनाचा पर्याय स्वीकारत असेल, तर तिच्या नैतिक भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने रशियावर आर्थिक निर्बंध लादले. रशियाकडून ऊर्जा खरेदी करणाऱ्या देशांनाही निर्बंध आणि अतिरिक्त शुल्काचे इशारे दिले. भारताने मात्र आपल्या ऊर्जा गरजा, आर्थिक हितसंबंध आणि नागरिकांना परवडणाऱ्या दरात इंधन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी लक्षात घेऊन रशियाकडून तेल खरेदी करण्याची भूमिका मांडली. भारताची भूमिका स्पष्ट होती. ऊर्जा आयातीचे निर्णय देशाच्या गरजांनुसार घेतले जातात; ते कोणत्याही एका महासत्तेच्या राजकीय इच्छेनुसार ठरू शकत नाहीत. मात्र, अमेरिकेने भारतावर दबाव आणण्याचे प्रयत्न केले. रशियाकडून तेल खरेदी म्हणजे अप्रत्यक्षपणे युद्धाला आर्थिक मदत, असा युक्तिवाद करण्यात आला. भारतीय वस्तूंवर अतिरिक्त आयात शुल्क लादण्यासारख्या उपायांमधूनही दबावाचे राजकारण दिसून आले. या धोरणामागे जागतिक शांततेची



चिंता असल्याचे सांगितले गेले; परंतु त्यातून अमेरिकेचे आर्थिक आणि सामरिक हितसंबंधही साधले जात असल्याचा प्रश्न उपस्थित होतो. आता अमेरिकेतच इंधनाचे दर वाढल्यामुळे रशियन डिझेलच्या आयातीचा पर्याय स्वीकारला जात असेल, तर त्यातून अमेरिकेच्या धोरणातील विरोधाभास स्पष्ट होतो. स्वतःच्या अर्थव्यवस्थेवर आणि नागरिकांवर संकट आले की निर्बंधांमध्ये सवलत द्यायची, पण अन्य देशांनी आपल्या गरजांनुसार निर्णय घेतल्यास त्यांना धारेवर धरायचे, ही भूमिका कितपत योग्य आहे? आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये तत्त्वे महत्त्वाची असली, तरी ती सर्व देशांना समान पद्धतीने लागू होणेही तितकेच आवश्यक आहे. अमेरिकेच्या या भूमिकेमुळे तिच्या मित्रदेशांमध्येही विश्वासाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय निर्बंध हे केवळ दबावाचे साधन नसून त्यांचा परिणाम जागतिक व्यापार, ऊर्जा पुरवठा आणि सामान्य नागरिकांच्या जीवनावर होतो. त्यामुळे निर्बंध लागू करताना त्यांचे दीर्घकालीन परिणाम आणि पर्यायी व्यवस्था यांचा विचार करणे आवश्यक आहे. अन्यथा, जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता वाढून अनेक देशांना त्याची किंमत मोजावी लागू शकते. भारतासाठी या घडामोडी महत्त्वाचा धडा देणाऱ्या आहेत. कोणत्याही महासत्तेवर अवलंबून न राहता स्वतंत्र परराष्ट्र धोरण, ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण आणि राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे. अमेरिका असो, रशिया असो किंवा चीन, प्रत्येक देश आपल्या हितसंबंधांनुसार निर्णय घेत असतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भावनिक आवाहनांपेक्षा वास्तववादी दृष्टिकोन अधिक महत्त्वाचा ठरतो. जागतिक राजकारणात नैतिकतेची कसोटी इतरांना उपदेश करण्यात नसून, स्वतःवर संकट आले तरी त्याच तत्त्वांचे पालन करण्यात असते. अमेरिकेने आपल्या धोरणांचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे. अन्यथा, तिच्या दुटप्पी भूमिकेमुळे इतर देश पर्यायी आर्थिक आणि सामरिक भागीदारीकडे वळतील. महासत्ता असण्याचा अर्थ इतर देशांवर दबाव टाकण्याचा अधिकार नव्हे, तर जागतिक व्यवस्थेत विश्वासार्हतेने वागण्याची जबाबदारी होय.

## ।। अभंगवाणी ।।



कपट कांहीं एक ।
नेणें भुलवायाचें लोक ॥१॥

तुमचें करितों कीर्त्तन ।
गातों उत्तम ते गुण ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिक्षकांना आता दिवाळीच्या सुट्ट्यात जबाबदारी

## निधी मिळणार नाही पण विशेष शालेय स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश

**महाईन्यूज । वर्धा**

**राज्यातील शिक्षकांना विविध कामे सोपविल्या जातात. अध्यापन सोडून इतरच कामे अधिक असतात, अशी ओरड पण होत असते. पण उपाय नाही, असा हताश सूर शिक्षक व्यक्त करीत असतात. शाळा हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा मुख्य केंद्रबिंदू असून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, शिस्त आणि सामाजिक जाणिवांचे धडे मिळावेत, असे शासनाचे म्हणणे.**



महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागातर्फे एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित शाळांमध्ये आगामी दिवाळीच्या कालावधीचा सकारात्मक उपयोग करून "चला शाळेत जाऊ या ... विशेष शालेय स्वच्छता मोहीम" राबविण्याचे अधिकृत परिपत्रक नुकतेच जारी करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांसाठी शाळांचा परिसर अधिक स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि आनंददायी राहावा, तसेच अध्ययन-अध्यापनासाठी पोषक वातावरण तयार व्हावे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. समग्र शिक्षा योजनेअंतर्गत शाळांमध्ये मूलभूत सुविधा आणि अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्मितीवर नेहमीच भर दिला जातो. याच पार्श्वभूमीवर शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि स्थानिक समुदायाला एकत्र आणून "माझी शाळा-माझी जबाबदारी" या भावनेतून ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

**दोन टप्प्यांत अंमलबजावणी**

१.पहिला टप्पा (१८ ते २४ ऑक्टोबर २०२६) या कालावधीत नियोजन व पूर्वतयारी केली जाईल. यात शाळा व्यवस्थापन समितीची बैठक घेणे, वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक कक्ष, क्रीडांगण व पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेची पाहणी करणे, तसेच आवश्यक दुरुस्ती आणि निरुपयोगी साहित्याची (भंगार) यादी तयार करून कृती आराखडा बनवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

२. दुसरा टप्पा (२५ ते ३१ ऑक्टोबर २०२६) प्रत्यक्ष कारवाईच्या या टप्प्यात शाळांची सखोल साफसफाई केली जाईल. यामध्ये वर्गखोल्यांची स्वच्छता, स्वच्छतागृहांची विशेष स्वच्छता, पाण्याच्या टाक्यांची सफाई, कचरा वर्गीकरणाची योग्य व्यवस्था तसेच विद्युत उपकरणे व फर्निचरची किरकोळ दुरुस्ती व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या उपाययोजनांना प्राधान्य दिले जाणार आहे.

मोहिमेच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी ते शिक्षणाधिकाऱ्यांपर्यंत सर्व स्तरांवर जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून, प्रत्येक शाळेने मोहीम सुरू करण्यापूर्वी आणि पूर्ण झाल्यानंतरची छायाचित्रे जतन करून ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या व्यापक मोहिमेमुळे राज्यातील शाळांचे रूपडे पालटून विद्यार्थ्यांसाठी आरोग्यदायी व प्रेरणादायी वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पण शिक्षक आता या नव्या जबाबदारीस कितपत गांभीर्याने घेतात, हे पाहणे रंजक ठरणार.

### आर्थिक तरतूद व लोकसहभाग

या मोहिमेसाठी शाळांना कोणतीही अतिरिक्त किंवा स्वतंत्र निधी दिला जाणार नाही. समग्र शिक्षा अंतर्गत शाळांच्या दैनंदिन गरजांसाठी मिळणाऱ्या एकत्रित अनुदानातून (COMPOSITE SCHOOL GRANT) नियमानुसार खर्च भागवण्याची मुभा देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या मोहिमेदरम्यान कोणत्याही विद्यार्थ्यांकडून सक्तीची किंवा अनिवार्य आर्थिक वर्गणी गोळा करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

# नाशिकमध्ये राज्यातील पहिले धान्य एटीएम सुरू; २४ तास रेशन

**महाईन्यूज । नाशिक**

**रास्तभाव दुकानांच्या वेळेची मर्यादा ओलांडून पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या सोयीच्या वेळी अन्नधान्य उपलब्ध व्हावे, या उद्देशाने राज्यातील पहिले अत्याधुनिक 'अन्नपूर्ती धान्य एटीएम' नाशिक येथे सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन आणि संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक अन्न कार्यक्रमाच्या सहकार्याने सुरू झालेल्या या उपक्रमामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक, गतिमान आणि लाभार्थीकेंद्रित होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.**




नाशिक रोड येथील विभागीय आयुक्त कार्यालयाजवळील गोरेवाडी रोड येथे मंत्री भुजबळ यांच्या हस्ते या धान्य एटीएमचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी एटीएमच्या माध्यमातून लाभार्थ्यांना धान्य वितरित करण्यात आले. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अडचणी दूर करून पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे अन्नधान्य सन्मानाने आणि वेळेत मिळावे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आज विविध क्षेत्रांत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना अन्नधान्य वितरण व्यवस्थेतही त्याचा प्रभावी वापर होणे आवश्यक आहे. 'अन्नपूर्ती धान्य एटीएम' हा त्याच दिशेने टाकलेला महत्त्वपूर्ण टप्पा आहे असे भुजबळ यांनी नमूद केले.

राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सुमारे ५४ हजार रास्तभाव दुकाने कार्यरत असून, त्यांच्यामार्फत सुमारे सात ते साडेसात कोटी लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ दिला जातो. निर्धारित प्रमाणात धान्य वितरण, प्रक्रियेतील त्रुटी दूर करणे आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविणे याला शासनाचे प्राधान्य आहे. रास्तभाव दुकानांच्या ठरावीक वेळेत धान्य घेणे अनेक नागरिकांना, विशेषतः कामानिमित्त बाहेर असणाऱ्या व्यक्तींना, अडचणीचे ठरते. धान्य एटीएमच्या सुविधेमुळे लाभार्थ्यांना अधिक सोयीच्या वेळी धान्य मिळविणे शक्य होईल, असे मंत्री भुजबळ यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी या अत्याधुनिक यंत्राच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना चोवीस तास धान्य वितरणाची सुविधा उपलब्ध होणार असून, नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. महाराष्ट्रात प्रस्तावित तीन धान्य एटीएमपैकी पहिल्या एटीएमची सुरुवात नाशिक येथे झाली असून, पुढील एटीएम नागपूर आणि ठाणे येथे सुरू करण्याचे नियोजन आहे.

### पारदर्शकतेकडे वाटचाल...

सार्वजनिक वितरण व्यवस्थेत ई-पॉस यंत्रणा, आधार आधारित प्रमाणीकरण आणि डिजिटल नोंदींच्या माध्यमातून पारदर्शकता वाढविण्यात येत आहे. धान्याची उचल, वाहतूक आणि लाभार्थ्यांपर्यंत वितरण या प्रक्रियांतील अनावश्यक टप्पे कमी केल्यास वेळेची बचत होऊन व्यवस्थेची कार्यक्षमता वाढेल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वितरणातील अडचणी कमी करून नागरिकांना अधिक सुलभ सेवा देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

# 'अन्यथा आम्ही उपोषणाला बसू'

## सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश संतापले; प्रशासनाला दिला इशारा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**मागण्या मान्य न झाल्यास सामान्य जनता आम्ही आंदोलनाला बसू, असा इशारा देताना आपण अनेकदा पाहिले असेल. पण ज्यांच्याकडून कोट्यवधी जनतेला न्यायाची अपेक्षा असते अशा सर्वोच्च न्यायालयालाच जेव्हा आपल्या मागण्यासाठी उपोषण करण्याची भाषा वापरावी लागते, तेव्हा परिस्थिती किती बिकट झाली असेल, याची प्रचिती येते. दिल्ली उच्च न्यायालयाच्या परिसरामध्ये पादचाऱ्यांसाठी योग्य पदपथ आणि रस्ता ओलांडण्याची सुरक्षित सोय उपलब्ध करून देण्यात अपयशी ठरलेल्या प्रशासनावर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.**



पुढील सुनावणीपूर्वी या समस्येवर तोडगा न निघाल्यास आम्ही स्वतः उच्च न्यायालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर उपोषणाला बसू, असा उपरोधिक आणि गंभीर इशारा सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने केंद्र व स्थानिक प्रशासनाला दिला.

न्यायमूर्ती जेबी पारडीवाला आणि न्यायमूर्ती केव्ही विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर या संदर्भातील याचिकेवर सुनावणी पार पडली. पादचाऱ्यांसाठी आवश्यक मूलभूत सुविधांची पूर्तता करण्यात प्रशासकीय यंत्रणांनी दाखवलेल्या अनास्थेबद्दल खंडपीठाने तीव्र शब्दांत नाराजी नोंदवली. केवळ कागदोपत्री समित्या गठीत करून चालणार नाही, प्रत्यक्ष जमिनीवर ठोस कृती दिसली पाहिजे, अशा स्पष्ट शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाला खडसावले.

अतिरिक्त सॉलिसिटर जनरल विक्रमजीत बॅनर्जी यांना उद्देशून बोलताना न्यायाधीशांनी उपरोधिक स्वरात म्हटले, "पुढील सुनावणीपूर्वी जर तुम्ही हे काम पूर्ण केले नाही, तर आम्ही दोघेही दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य गेटवर उपोषणाला बसू. जोपर्यंत काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत आम्ही तिथून घरी जाणार नाही, हे निश्चित समजा. तिथे आम्ही ठिय्या मांडू आणि मिस्टर बॅनर्जी, आम्ही तुम्हालाही घरी जाऊ देणार नाही."

या प्रकरणात आता कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असे स्पष्ट करत खंडपीठाने पुढील सुनावणीपर्यंत ठोस पावले न उचलल्यास दिल्ली सरकारच्या मुख्य सचिवांना प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश देऊ, असा सज्जड दमही दिला.

या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने स्पष्ट केले की, सुरक्षित पदपथ मिळणे हा संविधानाच्या कलम २१ (जगण्याचा अधिकार) आणि कलम १९(१)(ड) (संचार स्वातंत्र्य) अंतर्गत नागरिकांना मिळालेला मूलभूत हक्क आहे. त्यामुळे मोटार वाहनांच्या वाहतुकीपेक्षा पादचाऱ्यांच्या हक्कांना सर्वोच्च प्राधान्य मिळायला हवे, यावर न्यायालयाने भर दिला.

या पार्श्वभूमीवर सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी रस्त्यांच्या दुतर्फा सुरक्षित, स्पष्ट खुणा असलेले आणि अतिक्रमणमुक्त पदपथ उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. पदपथ ही काही रस्ते प्रकल्पांची 'ऐच्छिक' किंवा दुय्यम बाब नसून अनिवार्य गरज आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### अतिक्रमणे तत्काळ हटवण्याचे आदेश

पादचाऱ्यांना रस्त्यावरून धोकादायक पद्धतीने चालावे लागू नये यासाठी पदपथांवरील अनधिकृत स्टॉल्स, विजेचे खांब, कचरा आणि बेकायदा पार्किंग यांसारखी सर्व अतिक्रमणे तातडीने हटवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. न्यायालयाच्या निर्देशांचे पालन होते आहे की नाही यावर देखरेख ठेवण्यासाठी केंद्र सरकारने एका केंद्रीय प्राधिकरणाची स्थापना करावी, तसेच सुरुवातीच्या टप्प्यात पाच शहरांमध्ये पदपथ विकासाचा प्रायोगिक प्रकल्प राबवावा, अशी सूचनाही करण्यात आली.

## होर्मुझमध्ये भारतीय खलाशी असलेल्या दोन जहाजांवर प्रक्षेपक आणि ड्रोन हल्ले

**महाईन्यूज । इराण**

**होर्मुझच्या सामुद्रधुनीत 'एमटी एसटी ३' या कच्च्या तेलाच्या टँकरवर शुक्रवारी प्रक्षेपकाद्वारे हल्ला करण्यात आला. या जहाजावरील १५ भारतीय खलाशी सुरक्षित असल्याची माहिती केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी दिली. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**



दरम्यान, १४ ऑक्टोबर रोजी रोमानियातील सुलिना बंदराच्या नांगरक्षेत्रात ड्रोनने लक्ष्य केलेल्या 'यारा जे' या रासायनिक टँकरवरील नऊ भारतीय खलाशीही सुरक्षित आहेत. दोन्ही जहाजांवरील एकूण २४ भारतीय नागरिक सुरक्षित असून कोणालाही दुखापत झालेली नाही, अशी माहिती सोनोवाल यांनी 'एक्स'वरील पोस्टद्वारे दिली.

होर्मुझची सामुद्रधुनी हा जागतिक तेल आणि वायू वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा सागरी मार्ग आहे. या परिसरातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणच्या लष्कराने प्रतिबंधित क्षेत्रांमधून प्रवास करणाऱ्या व्यापारी जहाजांना आपल्या सशस्त्र दलांशी आधी समन्वय साधण्याचा इशारा दिला आहे.

इराणच्या सरकारी माध्यम 'प्रेस टीव्ही'च्या म्हणण्यानुसार, इराणी लष्कराच्या नौदलाने शुक्रवारी होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पूर्वेकडील ओमानच्या समुद्रात एका तेलवाहू जहाजाला आग लागल्याचे आढळल्याचे सांगितले. हे जहाज प्रतिबंधित क्षेत्रातून प्रवास करत होते आणि त्या भागातून जाताना त्याने आपली ट्रॅकिंग यंत्रणा बंद केली होती, असा दावा इराणी नौदलाने केला. मात्र, आग लागलेल्या जहाजाचे नाव स्पष्ट करण्यात आलेले नाही. त्यामुळे हे जहाज 'एमटी एसटी ३'च होते का, याची पुष्टी झालेली नाही.

प्रतिबंधित सागरी मार्गांवर पूर्वसमन्वयाशिवाय हालचाली केल्यास सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो आणि परिसरातील इतर जहाजेही संकटात येऊ शकतात, असा इशारा इराणी नौदलाने दिला आहे.

इराणी लष्कराचे प्रवक्ते ब्रिगेडियर जनरल मोहम्मद अक्रमिनिया यांनी शुक्रवारी जहाजमालक आणि जहाज परिचालकांना या प्रदेशात प्रवेश करण्यापूर्वी किंवा होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करण्यापूर्वी इराणच्या सशस्त्र दलांशी समन्वय साधण्याचे आवाहन केले. अक्रमिनिया यांच्या मते, या मार्गावरून सुरक्षित प्रवास करण्यासाठी जहाजांनी आधी इराणी लष्कराशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

अमेरिका अलीकडच्या आठवड्यांत जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या दक्षिणेकडील पर्यायी मार्गाने जाण्यास सांगत असल्याचा आरोपही त्यांनी केला. हा मार्ग व्यापारी जहाजांसाठी सुरक्षित नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या मार्गाचा वापर करणाऱ्या काही जहाजांचे नुकसान झाल्याचाही त्यांनी दावा केला. मात्र, या दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

इराणी प्रवक्त्याने असा दावा केला की, त्यांच्या लष्कराशी समन्वय साधून प्रवास करणाऱ्या जहाजांना या सामुद्रधुनीतून मालवाहतूक करताना अडचणी आल्या नाहीत.




# ‘महानटी’ मुळे गाजली कीर्ती

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाने वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक म्हणजे कीर्ती सुरेश! बालकलाकार म्हणून अभिनयाची सुरुवात करणाऱ्या कीर्ती यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर चित्रपटसृष्टीत महत्त्वाचे स्थान मिळवले. मलयाळम, तमिळ आणि तेलुगू चित्रपटांमध्ये काम करत त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. विशेष म्हणजे, अभिनेत्री सावित्री यांच्या जीवनावर आधारित ‘महानटी’ या चित्रपटातील भूमिकेने त्यांच्या कारकिर्दीला मोठे वळण दिले. या भूमिकेसाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १७ ऑक्टोबर रोजी कीर्ती सुरेश यांचा वाढदिवस असतो. त्यानिमित्ताने जाणून घेऊया त्यांचा बालकलाकार ते आघाडीची अभिनेत्री होण्यापर्यंतचा प्रवास. कीर्ती सुरेश यांचा जन्म १७ ऑक्टोबर १९९२ रोजी चेन्नई येथे झाला. त्यांचे वडील सुरेश कुमार हे चित्रपट निर्माते आहेत, तर आई मेनका या अभिनेत्री म्हणून ओळखल्या जातात. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांना चित्रपटसृष्टीचे वातावरण अनुभवायला मिळाले. कीर्ती यांनी वयाच्या लहानपणीच अभिनयाला सुरुवात केली. २००० मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘पायलट्स’ या चित्रपटातून त्यांनी बालकलाकार म्हणून काम केले.



## कंगना रणौतला मोठा दिलासा.!

चित्रपटसृष्टी आणि छोट्या पडद्यावरील कलाकारांना अनेकदा कास्टिंग काऊचसारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. अनेक कलाकारांनी याबाबतचे कटू अनुभव सार्वजनिकपणे सांगितले आहेत. ‘तारक मेहता का उल्टा चश्मा’ या लोकप्रिय मालिकेमुळे ओळख मिळवलेली अभिनेत्री आराधना शर्मा हिनेही कास्टिंग काऊचचा धक्कादायक अनुभव शेअर केला होता. आराधनाने सांगितल्यानुसार, ती अवघ्या १९ वर्षांची असताना तिच्यासोबत हा प्रकार घडला. स्क्रिप्ट वाचण्याच्या बहाण्याने एका कास्टिंग डायरेक्टरने तिच्याशी अयोग्य वर्तन केल्याचा आरोप तिने केला होता. या घटनेचा तिच्या वैयक्तिक आयुष्यावरही मोठा परिणाम झाला आणि पुरुषांवरील तिचा विश्वास कमी झाल्याचे तिने सांगितले होते. २०२१ मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत आराधना शर्माने तिच्यासोबत घडलेल्या या घटनेबद्दल भाष्य केले होते. ही घटना २०१६-१७ च्या सुमारास घडल्याचे तिने सांगितले. त्या वेळी ती पुण्यात शिक्षण घेत होती आणि मॉडेलिंगही करत होती. तिची एका कास्टिंग करणाऱ्या व्यक्तीशी ओळख होती. एका भूमिकेसाठी कास्टिंग सुरू असल्याचे सांगून तिला रांची येथे बोलावण्यात आले होते. तिथे एका खोलीत स्क्रिप्ट वाचत असताना संबंधित व्यक्तीने तिला अयोग्य पद्धतीने स्पर्श करण्याचा प्रयत्न केल्याचे आराधनाने सांगितले. सुरुवातीला नेमके काय घडत आहे हे तिला समजले नाही. मात्र, परिस्थिती लक्षात येताच तिने त्या व्यक्तीला दूर ढकलले आणि दरवाजा उघडून तिथून पळ काढला. या घटनेनंतर अनेक दिवस ती कोणालाही याबद्दल सांगू शकली नव्हती. संबंधित स्क्रिप्टमध्ये प्रेमप्रसंगाचा सीन होता. मात्र, स्क्रिप्ट वाचण्याच्या निमित्ताने घडलेल्या या प्रकारामुळे तिला मानसिक त्रास सहन करावा लागल्याचे तिने मुलाखतीत सांगितले होते.

# रजनीकांतच्या ‘जेलर 2’चा जलवा.!

सुपरस्टार रजनीकांत यांची क्रेझ नेमकी किती मोठी आहे, याचा प्रत्यय पुन्हा एकदा बॉक्स ऑफिसवर आला आहे. वयाची पर्वा न करता आपल्या स्टाइलने, दमदार स्क्रीन प्रेझेन्सने आणि जबरदस्त ॲक्शनने प्रेक्षकांना भुरळ घालणाऱ्या थलायवाने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली आहे. त्यांच्या बहुप्रतीक्षित ‘जेलर 2’ या चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवसापासून कमाईचा धडाका लावला असून, अवघ्या दोन दिवसांत जगभरातील बॉक्स ऑफिसवर 200 कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. त्यामुळे चित्रपटसृष्टीत आणि चाहत्यांमध्ये या सिनेमाची जोरदार चर्चा रंगली आहे. 2023 मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘जेलर’ या चित्रपटाला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. रजनीकांत यांच्या टायगर मुथुवेल पांडियन या व्यक्तिरेखेने चाहत्यांच्या मनावर वेगळीच छाप पाडली. त्यामुळे या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची उत्सुकता दीर्घकाळापासून होती. अखेर 15




ऑक्टोबर 2026 रोजी ‘जेलर 2’ चित्रपटगृहांमध्ये दाखल झाला आणि त्याने पहिल्याच दिवसापासून बॉक्स ऑफिसवर आपली ताकद दाखवायला सुरुवात केली. विशेष म्हणजे, या चित्रपटाने भारतातच नव्हे, तर परदेशातील बाजारपेठांमध्येही दमदार कामगिरी केली आहे. ‘जेलर 2’च्या कमाईचे आकडे पाहिल्यानंतर रजनीकांत यांची लोकप्रियता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. चित्रपटाने पहिल्या दिवशी म्हणजेच गुरुवारी भारतात 59.70 कोटी रुपयांची नेट कमाई केली. दमदार ओपनिंगनंतर दुसऱ्या दिवशी, शुक्रवारी, चित्रपटाने भारतात 35.60 कोटी रुपयांची नेट कमाई केली. त्यामुळे पहिल्या दोन दिवसांतील भारतातील एकूण नेट कलेक्शन 95.30 कोटी रुपयांवर पोहोचले. परदेशातील बाजारपेठांमध्येही या चित्रपटाने दमदार कामगिरी केली आहे. पहिल्या दोन दिवसांत जगभरातील ग्रॉस कलेक्शन 209.10 कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे वृत्त आहे.

# मी २६ दिवस रिहॅब सेंटरमध्ये होतो

## पॉडकास्टमध्ये युझवेंद्र चहलचा दारूच्या व्यसनाबद्दल आणि मानसिक आरोग्याबाबतही केले भाष्य

**महाईन्यूज । मुंबई**

**भारतीय क्रिकेट संघाचा माजी फिरकीपटू युझवेंद्र चहलने वैयक्तिक आयुष्यातील वादळ, घटस्फोटाचे नैराश्य आणि दारूच्या व्यसनाबाबत अत्यंत मनमोकळेपणाने मोठा खुलासा केला आहे. माजी क्रिकेटपटू आकाश चोप्राच्या 'बॅथ अँड बोल' या पॉडकास्टमध्ये बोलताना चहलने ही कबुली दिली. व्यसन नियंत्रणाबाहेर गेल्याचे लक्षात आल्यानंतर आपण स्वतःहून व्यावसायिक मदत घेतल्याचे त्याने स्पष्ट केले.**



"मी एका रिहॅब सेंटरमध्ये २६ दिवस राहिलो. आता मद्यपानावर नियंत्रण कसे ठेवावे, काय करावे हे मला समजले आहे. यामुळे माझ्या आयुष्यात खूप मोठा बदल झाला. वैयक्तिक आयुष्यातही मी आता गोष्टी अधिक समजूतदारपणे हाताळतो. माझ्या भावनांवर आता माझे नियंत्रण आले आहे." डिसेंबर २०२२ मध्ये कोरिओग्राफर धनश्री वर्मा हिच्याशी विवाह करणारा चहल जून २०२२ पासून स्वतंत्र राहत होता. त्यानंतर मार्च २०२५ मध्ये मुंबईतील वांद्रे फॅमिली कोर्टाने दोघांना परस्पर संमतीने घटस्फोट मंजूर केला होता.

मद्यपानामुळे आपल्या क्रिकेटवर फारसा परिणाम झाला नाही, असे सांगताना त्याने वैयक्तिक आयुष्य मात्र उद्ध्वस्त झाल्याची कबुली दिली. माझ्या क्रिकेटवर याचा फारसा परिणाम झाला नाही, पण माझे वैयक्तिक आयुष्य यामुळे खूप उद्ध्वस्त झाले. त्यानंतर मात्र भूतकाळ मागे सोडण्याचा निर्णय घेतला. आता मी आनंदी आहे, आयुष्य जगतोय, गोगार्टिंग आणि गोल्फ खेळतोय. आता मी खूप चांगल्या स्थितीत आहे." आयपीएल सुरू झाल्यानंतर आम्ही सलग तीन वर्षे तुफान पार्ट्या केल्या होत्या. मात्र, घटस्फोटानंतर जेव्हा मानसिक स्थिती खालावली आणि व्यसन ओलांडून पुढे गेले, तेव्हा मला जाणीव झाली की, असेच सुरू राहिले, तर माझ्यातील क्रिकेटच संपून जाईल. अशा कठीण प्रसंगात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा (RCB) माजी सहकारी एबी डिव्हिलियर्स याने आयुष्यात समतोल कसा राखायचा, याबाबत मोलाचा सल्ला दिल्याचेही त्याने आवर्जून सांगितले.

"अँग्झायटी (अस्वस्थता) अशी असते की आतून तुमचे हृदय खूप वेगाने धडकू लागते. पॅनिक्स अटॅक आल्यावर माझा चेहरा आकुंचन पावल्यासारखा व्हायचा, मला बोलताही येत नव्हते. ओठ इतके घट्ट आणि एका बाजूला ओढले जायचे की समोरच्याला लगेच समजायचे की काहीतरी गडबड आहे," अशी कबुलीही त्याने दिली.

### घटस्फोटानंतर वाढले दारुचे व्यसन

चहल म्हणाला की, आयपीएलच्या सुरुवातीच्या दिवसांत पार्ट्यांमध्ये मद्यपान करणे ही एक साधी गोष्ट होती; मात्र गेल्या वर्षी घटस्फोट झाल्यानंतर ही सवय हाताबाहेर गेली. वैयक्तिक आयुष्यातील नैराश्य आणि मानसिक ताणतणावामुळे मद्यपानाचे प्रमाण वाढले होते, असे त्याने सांगितले. या कठीण काळातून बाहेर पडण्यासाठी त्याने तब्बल २६ दिवस रिहॅब सेंटरमध्ये घालवले, अशी कबुलीही त्याने दिली. या अनुभवातून सावरण्यासाठी चहलने स्वतःच्या मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्याचा आणि आयुष्याला नव्याने सुरुवात करण्याचा निर्णय घेतला.

# मुंबई इंडियन्सला नव्या हंगामासाठी शोधावा लागणार नवा प्रशिक्षक

**महाईन्यूज । मुंबई**

**महेला जयवर्धनेने मुंबई इंडियन्सचे मुख्य प्रशिक्षक पद सोडले आहे. आयपीएल २०२७ पूर्वी त्याने हा निर्णय घेतला आहे. जयवर्धने मुंबई इंडियन्स सोबतच्या आपल्या दुसऱ्या टर्ममध्ये गेल्या दोन हंगामात संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहिलं होते. यापूर्वी त्याने २०१७ ते २०२२ पर्यंत मुंबई इंडियन्सचे प्रशिक्षक पद निभावली होतं.**




### काय म्हणाला जयवर्धने

जयवर्धने म्हणाला, 'मुंबई इंडियन्स गेल्या एका दशकापासून माझ्या प्रवासाचा एक महत्वाचा भाग राहिला आहे. खेळाडू, कोचिंग स्टाफ, वन फॅमिलीचा जबरदस्त पाठिंबा आणि चाहत्यांचा असा अनुभव मिळाला आहे की तो मी आयुष्यभर सांभाळून ठेवणार आहे. एकत्र आम्ही काही स्मरणीय क्षण अनुभवले. आव्हानांचा मुकाबला केला आणि आम्ही असं काही तयार केलं आहे की त्याच्यावर आम्हाला खूप गर्व आहे. इतक्या वर्षात विश्वास, साथ आणि मैत्रीसाठी मी नीता अंबानी आणि आकाश अंबानी यांचे मनापासून आभार मानते. आम्ही एकत्र मिळून जे साध्य केलं त्याच्यावर मला गर्व आहे. MI साठी माझ्या हृदयात कायम एक खास जागा असेल. मी संघाला पुढच्या यशासाठी शुभेच्छा देतो.

मुंबई इंडियन्सने आज प्रेस रिलीजमध्ये सांगितलं की, 'मुंबई इंडियन्स आज घोषणा करत आहे की महेला जयवर्धने आपले मुख्य प्रशिक्षकाचे पद सोडत आहे. वन फॅमिलीसोबतची त्यांची एक दशकाची साथ आता संपुष्टात येणार आहे.' जयवर्धनेने मुख्य प्रशिक्षक म्हणून मुंबई इंडियन्सला तीन आयपीएल टायटल मिळवून देण्यात मोलाची भूमिका निभावली होती. मुंबई इंडियन्सने जयवर्धनेने त्यांच्या फ्रेंचायजीचे कल्चर तयार करणे आणि मुख्य प्रशिक्षक म्हणून आपल्या कार्यकाळात शिस्त, सहकार्य आणि संघ प्रथम हा अप्रोच निर्माण केला.

जयवर्धनने पुन्हा मुंबई इंडियन्स का सोडली? आता मुंबईचा पुढचा प्रशिक्षक कोण असणार हे प्रश्न आता उपस्थित झाले आहेत. जयवर्धने मुंबई इंडियन्ससोबत जवळपास एक दशक आहे. त्या काळात त्याला खेळाडू, कोचिंग स्टाफ, चाहते आणि फ्रेंचायजी मालक नीता आणि आकाश अंबानी यांचा पाठिंबा आणि विश्वास मिळाल्याबद्दल आभार मानले आहेत.

मुंबई इंडियन्सने आज प्रसिद्ध केलेल्या प्रेस रिलीजमधून महेला जयवर्धने मुख्य प्रशिक्षकपद सोडणार असल्याची अधिकृत घोषणा केली आहे. जयवर्धने यांची 'वन फॅमिली'सोबतची जवळपास दशकभराची साथ आता संपुष्टात येणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई इंडियन्सने तीन आयपीएल विजेतेपदे मिळवण्यात महत्त्वपूर्ण यश संपादन केले. संघाची संस्कृती घडवण्यात तसेच शिस्त, सहकार्य आणि संघाला प्रथम प्राधान्य देण्याची वृत्ती रुजवण्यात जयवर्धने यांचे मोठे योगदान राहिले. त्यांनी खेळाडू, प्रशिक्षक कर्मचारी, चाहते आणि फ्रेंचायझीच्या मालक नीता अंबानी व आकाश अंबानी यांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल आणि विश्वासाबद्दल आभार मानले आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
दि. 18 ऑक्टोबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# बनावट ट्रेडिंग ॲपद्वारे ८६ लाखांची फसवणूक

## कंबोडियातील सूत्रधाराशी संपर्क; डॉक्टर, सीए आणि इंजिनिअरचा समावेश, सहा आरोपी अटकेत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शेअर बाजारात मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायबर टोळीविरुद्ध पिंपरी-चिंचवड पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. बनावट ट्रेडिंग ॲपच्या माध्यमातून एका ज्येष्ठ नागरिकाची तब्बल ८६ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नऊ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.**




या प्रकरणात सहा आरोपींना अटक करण्यात आली असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे. अटक केलेल्या संशयितांमध्ये डॉक्टरकीचे शिक्षण घेतलेले, चार्टर्ड अकाउंटंट होण्याच्या तयारीत असलेले आणि इंजिनिअरिंग क्षेत्रातील तरुणांचा समावेश असल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे.

शेअर बाजारात गुंतवणूक करून अल्पावधीत मोठा नफा मिळवता येईल, असे सांगून सायबर गुन्हेगारांनी संबंधित ज्येष्ठ नागरिकाचा विश्वास संपादन केला. त्यानंतर बनावट ट्रेडिंग ॲपच्या माध्यमातून गुंतवणुकीस प्रवृत्त करून त्यांची ८६ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार पिंपरी-चिंचवड सायबर पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. पैशांच्या व्यवहारांचा मागोवा घेतल्यानंतर या गुन्ह्यामागे एक संघटित टोळी कार्यरत असल्याचे तपासात समोर आले.

पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे पुणे, लातूर, अहिल्यानगर, नवी मुंबई आणि हैदराबाद परिसरातून सहा संशयितांना अटक केली. या आरोपींमध्ये उच्चशिक्षित तरुणांचाही समावेश आहे. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे. दरम्यान, फसवणुकीच्या रकमेपैकी २८ लाख रुपये पोलिसांनी तपासादरम्यान गोठवले होते. न्यायालयाच्या आदेशानंतर ही रक्कम फिर्यादी ज्येष्ठ नागरिकाला परत मिळवून देण्यात आली. उर्वरित रकमेचा मागोवा घेण्याचे आणि या गुन्ह्यात सहभागी असलेल्या इतर व्यक्तींची भूमिका तपासण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

तपासादरम्यान या टोळीशी संबंधित आरोपींविरुद्ध पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि गुजरात येथेही खंडणी, दरोडा, अमली पदार्थांची तस्करी तसेच फसवणुकीसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या टोळीचे जाळे किती व्यापक आहे, तसेच इतर आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांशी त्यांचा संबंध आहे का, याचा तपास केला जात आहे. संघटित पद्धतीने सुरू असलेल्या गुन्हेगारीचे गांभीर्य लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींविरुद्ध मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली. अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड यांनी संबंधित कलमांचा समावेश करण्याचे आदेश दिले. सहायक पोलीस आयुक्त बनकर यांच्या नेतृत्वाखालील पथक या प्रकरणाचा पुढील तपास करत आहे.

### कंबोडियातील सूत्रधाराशी संपर्क

पोलिसांच्या तपासानुसार, या टोळीतील संशयित आरोपी कंबोडिया येथे असलेल्या मुख्य सूत्रधाराच्या संपर्कात राहून सायबर फसवणुकीचे प्रकार करत असल्याचा आरोप आहे. फसवणुकीतून मिळालेली रक्कम विविध बँक खात्यांमधून वळवून ती यूएसडीटीसारख्या क्रिप्टोकरन्सीमध्ये रूपांतरित केली जात असल्याचे तपासात आढळले. अशा प्रकारे पैशांचा मागोवा घेणे कठीण होईल, यासाठी व्यवहारांची साखळी तयार केली जात असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. या प्रकरणात केवळ आर्थिक फसवणूकच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या संघटित गुन्हेगारीचे धागेदोरेही समोर आल्याने पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढवली आहे.

---

# राष्ट्रीय गतका स्पर्धेत आरकेएल गॅलक्सी स्कूलची दमदार कामगिरी!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**हरियाणामधील फत्तेहाबाद जिल्ह्यातील रतिया येथील 'गुरु नानक डिफेन्स अँड स्पोर्ट्स अकादमी' (जवळ गवार सिटी) येथे पार पडलेल्या '१० व्या राष्ट्रीय सब-ज्युनिअर आणि ज्युनिअर गतका चॅम्पियनशिप २०२६' (पुरुष व महिला) मध्ये आर. के. एल. गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूल, वडमुखवाडी च्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**




या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत आरकेएल गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या 'सिंगल सोटी' (Single Soti) संघाने अत्यंत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ११ वर्षांखालील (Under-11) गटात कांस्य पदक (Bronze Medal) पटकावून शाळेचे व पिंपरी-चिंचवड शहराचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल केले आहे. या यशस्वी संघात अपूर्वा मोरे (Apurva More), अर्जुन घावळे (Arjun Ghavale) आणि अद्वैत तापकीर (Advait Tapkir) या होतकरू विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ही धडाकेबाज कामगिरी केली. देशभरातून विविध राज्यांतील नामवंत व मातब्बर खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत आरकेएलच्या विद्यार्थ्यांनी अंडर-११, अंडर-१४ आणि अंडर-१७ या वयोगटांमध्ये सहभाग नोंदवत आपल्या उत्कृष्ट कौशल्याच्या, चपळतेच्या आणि शिस्तीच्या जोरावर बाजी मारली. चिमुकल्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर दाखवलेल्या या चमकदार कामगिरीबद्दल क्रीडा क्षेत्रातून व पालकांकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

> आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय गतका स्पर्धेत मिळवलेले यश आणि पटकावलेले कांस्य पदक अत्यंत अभिमानास्पद आहे. अपूर्वा मोरे, अर्जुन घावळे आणि अद्वैत तापकीर या विद्यार्थ्यांनी दाखवलेली जिद्द, कठोर परिश्रम आणि खेळावरील निष्ठा यामुळेच ही उज्ज्वल कामगिरी शक्य झाली आहे. शाळा नेहमीच विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकासासोबतच क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन देते. या यशात खेळाडूंसोबतच त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे आणि पालकांचेही मोठे योगदान आहे. विजयी खेळाडूंना पुढील उज्ज्वल भविष्यासाठी आणि क्रीडा प्रवासासाठी माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा!
>
> - डॉ. पुष्कर चोबे, सीईओ, आरकेएल गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूल.

### शाळेकडून विजयी खेळाडूंचा विशेष सत्कार

राष्ट्रीय स्तरावर कांस्य पदक पटकावून शाळेचा गौरव वाढविणाऱ्या अपूर्वा मोरे, अर्जुन घावळे, अद्वैत तापकीर या सर्व विजयी खेळाडूंचा आणि त्यांना मोलाचे मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षकांचा आरकेएल गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या व्यवस्थापनातर्फे विशेष सत्कार करण्यात आला व पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# अजित पवार हयात असते तर..

## विधान भवन परिसरात आता परवानगीसाठी काही महत्त्वाचे निर्णय अण्णा बनसोडे यांच्याकडून नाराजी व्यक्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत थेट पक्षपाताचा आरोप केला आहे. अजित पवार हयात असते, तर असं करण्याचं धाडस झालं नसतं, असं परखड विधान बनसोडे यांनी केलं आहे. त्यामुळे या वक्तव्याची राजकीय वर्तुळात चर्चा होण्याची शक्यता आहे.**



### अण्णा बनसोडे राहुल नार्वेकर यांच्याबद्दल काय म्हणाले?

नागरिकांना पास देण्यासाठी पोलीस पडताळणी आणि चौकशीची प्रक्रिया राबवली जात असेल, तर ती सर्वांसाठी समान असायला हवी. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे येणाऱ्या नागरिकांना पाच मिनिटांत प्रवेश दिला जातो, मग आमच्याकडे येणाऱ्या नागरिकांना दोन ते अडीच तास का थांबावं लागतं? असा सवाल अण्णा बनसोडे यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे आता विधान भवनातील प्रवेश प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी प्रशासनाकडून कोणती पावले उचलली जातात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

अण्णा बनसोडे आणि उपसभापती सचिन अहिर यांना भेटण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून नागरिक विविध कामं घेऊन विधान भवनात येतात. दररोज सुमारे 200 ते 250 नागरिक भेटीसाठी येत असल्याचं बनसोडे यांनी सांगितलं. यापूर्वी नागरिकांना अवघ्या पाच ते दहा मिनिटांत पास मिळत होता. मात्र, आता पोलीस व्हेरिफिकेशन आणि चौकशीच्या प्रक्रियेमुळे पास मिळवण्यासाठी दोन ते अडीच तास प्रतीक्षा करावी लागत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना इतका वेळ ताटकळत उभं राहावं लागणं योग्य नसल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. आम्हाला राजकारण करायचं नाही, तर नागरिकांची कामं महत्त्वाची आहेत, अशी भूमिका बनसोडे यांनी मांडली.

या संपूर्ण प्रकरणात अण्णा बनसोडे यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा उल्लेख करत नाराजी व्यक्त केली. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार हयात असते, तर अशा प्रकारचं धाडस झालं नसतं, असं विधान त्यांनी केलं. दरम्यान, या प्रश्नावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचंही अण्णा बनसोडे यांनी स्पष्ट केलं आहे.

आता अण्णा बनसोडे यांच्या आरोपांवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर काय भूमिका घेतात? नागरिकांसाठी प्रवेशाची प्रक्रिया सर्वांना समान लागू होणार का? आणि अजित पवार यांचा उल्लेख करत करण्यात आलेल्या या विधानावर राजकीय वर्तुळातून काय प्रतिक्रिया उमटतात? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. विधान भवनात प्रवेशासाठी लागू करण्यात आलेल्या या नव्या प्रक्रियेमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दा अण्णा बनसोडे यांनी उपस्थित केला आहे. नागरिकांना वेळेत पास मिळावा आणि त्यांच्या कामांसाठी होणारा विलंब टाळावा, अशी त्यांची मागणी आहे. पोलीस पडताळणी आवश्यक असली, तरी नागरिकांना उन्हात तासनतास उभे राहावे लागू नये, यासाठी योग्य व्यवस्था करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. या संदर्भात वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## वाचन प्रेरणा दिनानिमित्त पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय व्याख्यानमाला उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी येथील ग्रंथालय व संशोधन कक्षातर्फे दि. १६ ऑक्टोबर रोजी पदव्युत्तर (PG) विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. संशोधन लेखन आणि जबाबदार प्रकाशन पद्धती या विषयांवर आधारित दोन सत्रांचा या व्याख्यानमालेत समावेश होता.**



कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक डॉ. बी. बी. वाफारे व उपसंचालक डॉ. अक्षद कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्या सत्रात डॉ. मीनल ओक ग्रंथपाल, एमईएस (MES) इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड करिअर कोर्सेस यांनी "संशोधनातील लेखन, नैतिकता आणि प्रकाशन" (Writing, Ethics, and Publishing in Research) या विषयावर मार्गदर्शन केले. प्रभावी संशोधन लेखनाची मूलतत्त्वे, संशोधनातील नैतिक आचरणाचे महत्त्व आणि शोधनिबंध प्रकाशनाची प्रक्रिया याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. या सत्राला १३३ विद्यार्थी उपस्थित होते.

दुसऱ्या प्रात्यक्षिक सत्रात डॉ. वृषाली दांडवते यांनी ग्रंथपाल, ए आयएसएसएमएस (AISSMS) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे "प्रिडेटरी जर्नल्स : ओळख व त्यापासून बचाव आणि ओपन ॲक्सेस प्रकाशन" (Predatory Journals: How to Identify and Avoid Them & Open Access Publishing) या विषयावर मार्गदर्शन केले. प्रिडेटरी जर्नल्स कशी ओळखावीत, प्रकाशनातील सामान्य चुका कशा टाळाव्यात तसेच ओपन ॲक्सेस प्रकाशनाचे फायदे व संधी याविषयी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. या सत्राला ८३ विद्यार्थी उपस्थित होते. दोन्ही सत्रांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करताना महाविद्यालयाचे संचालक डॉ. डॉ. बी. बी. वाफारे म्हणाले, "वाचन ही संशोधनाची पहिली पायरी आहे. आजच्या स्पर्धात्मक काळात दर्जेदार संशोधनासोबतच संशोधनातील नैतिकता आणि योग्य प्रकाशन माध्यमांची निवड अत्यंत महत्त्वाची आहे. प्रिडेटरी जर्नल्सच्या वाढत्या धोक्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रवासासाठी निश्चितच मार्गदर्शक ठरेल. ग्रंथालय व संशोधन कक्षाने असे उपक्रम सातत्याने राबवावेत." त्यांनी आयोजकांचे व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल डॉ. राहुल बराथे व संशोधन अधिष्ठाता डॉ. वैशाली खेडेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सारिका पडवळ, आदर्श तांबे व सुवर्णा सानप यांनी सहकार्य केले.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046